भतवाल हॉस्पिटल
म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर,मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711


# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

POST REGD.NO./DHL/53/24-26

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२४९ ■ शुक्रवार १२ जुन २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४


घरचा स्वाद,
घरची शुध्दता...



नवल
शुध्द घी
म्हशीचे व गायीचे साजुक तूप
मे. नवलमल दौलतराम, बॉम्बेलॉज खाली, आग्रा रोड,धुळे
फोन : (02562) 238661 email : navalgheedhule@gmail.com

# अमेरिकेने इराणवर एकोणपन्नास क्षेपणास्त्र हल्ले इराणकडून एकोणावीस विमानतळे उडवली

**वॉशिंग्टन, दि. ११ : पश्चिम आशियातील तणाव अत्यंत धोकादायक वळणावर पोहोचला आहे. अमेरिका आणि इराण यांच्यात पुन्हा युद्ध पेटण्याची चिन्हे दिसत आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिलेल्या इशाऱ्यानंतर अमेरिकन सैन्याने इराणवर भीषण क्षेपणास्त्र हल्ले केले. या कारवाईला चोख प्रत्युत्तर देत इराणच्या इस्लामिक रिव्हॉल्युशनरी गार्डस् कोरने बहरीन, कुवेत आणि इराक मधील अमेरिकेच्या तब्बल १९ लष्करी तळांवर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांद्वारे जोरदार मारा केला आहे. या अभूतपूर्व संघर्षामुळे इराणने जागतिक व्यापारासाठी**



**अत्यंत महत्त्वाची असलेली होर्मुझची सामुद्रधुनी सर्व प्रकारच्या जहाजांसाठी पूर्णपणे बंद करण्याची घोषणा केली आहे.**

अमेरिकेचे ४९ टॉमहॉक क्षेपणास्त्रांनी हल्ले

इराणने अमेरिकेचे एक हेलिकॉप्टर पाडल्यानंतर दोन्ही देशांमधील संघर्ष तीव्र झाला. अमेरिकन सेंट्रल कमांडने बुधवारी स्वसंरक्षणासाठी इराणच्या अनेक तळांना लक्ष्य केले. अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या माहितीला दुजोरा दिला आहे. अमेरिकेने टॉमहॉक क्षेपणास्त्रांसह एकूण ४९ क्षेपणास्त्रांद्वारे इराणच्या महत्त्वाच्या भागांवर हल्ले केले आहेत. तसेच इराणच्या नेत्यांनी शांतता करारासाठी खूप उशीर केल्याचा आरोप करत, जर करार केला नाही तर शस्त्रसंधी मोडून याहून मोठे हल्ले केले जातील, अशी धमकी ट्रम्प यांनी दिली आहे. अमेरिकेचे संरक्षणमंत्री पीट हेगसथ यांनीही इराणच्या महत्त्वपूर्ण केंद्रांवर बॉम्ब टाकले जातील, असा इशारा दिला आहे.

अमेरिकेच्या १९ लष्करी तळांवर प्रतिहल्ला

अमेरिकेच्या या हल्ल्यासमोर न झुकता इराणने काही तासांतच भीषण प्रतिहल्ला चढवला. इराणच्या अधिकृत वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, इराणने बहरीन मधील अमेरिकेच्या पाचव्या नौदल ताफ्याच्या पॅट्रीयट प्रणालीचे रडार आणि संप्रेषण अँटेना उद्ध्वस्त केले आहेत. याशिवाय, कुवेतमधील अली अल सलेम आणि अहमद अल जुबेर एअरबे, (पान ४ वर)

## राज्यात मान्सून लांबला पाच दिवसांनी परतणार

मुंबई, दि. ११ : राज्यातील नागरिकांना दिलासा देणाऱ्या मान्सूनच्या प्रगतीला दोन दिवसांपासून ब्रेक लागला आहे. महाराष्ट्रातील मान्सूनचा प्रवास सध्या एकाच भागात थांबला आहे. पुढील पाच दिवसांत तो राज्यातील आणखी काही भाग व्यापण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने व्यक्त केली आहे. आज कोकण, विदर्भासह काही जिल्ह्यांमध्ये तुरळक पाऊस पडण्याची शक्यता असल्याने यलो अलर्ट देण्यात आला आहे. दरम्यान शेतकरी राजा अद्यापही मान्सूनच्या प्रतीक्षेत आहे.

मान्सून सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि सांगली जिल्हे पार करत रत्नागिरी, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांपर्यंत व्यापला होता. मात्र, त्यानंतर त्याच्या प्रगतीचा वेग मंदावला आहे. सध्या मान्सूनची सीमा रत्नागिरी जिल्ह्यातील हर्णे, सोलापूर तसेच कर्नाटकातील (पान ४ वर)

# जिल्ह्याच्या सर्वसमावेशक विकासासाठी प्रयत्न करावेत पालकमंत्री जयकुमार रावलांचे आढावा बैठकीत निर्देश



**धुळे, दि.११- आकांक्षित धुळे जिल्ह्यात जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून सर्वसमावेशक विकासासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.**

पालकमंत्री रावल यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील नवीन नियोजन सभागृहात जिल्हा वार्षिक योजनेची आढावा बैठक झाली. त्यावेळी पालकमंत्री श्री. रावल बोलत होते. यावेळी खासदार डॉ.शोभा बच्छाव, आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम पावरा, आमदार मंजुळा गावित, जिल्हा नियोजन समितीच्या सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, पोलीस अधीक्षक विशाल आनंद, महानगरपालिका आयुक्त नितीन कापडणीस, अपर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर, निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार, जिल्हा नियोजन अधिकारी सुनील सोनार, सहायक नियोजन अधिकारी संतोष वानखेडे, एकात्मिक आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी अरुण पवार, समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त देविदास नांदगावकर यांच्यासह सर्व विभागांचे (पान ४ वर)

**लोकप्रतिनिधी अनुपस्थित**

महत्वाच्या अशा जिल्हा वार्षिक योजना आढावा बैठकीस आज आ.अनुप अग्रवाल व आ. राम भदाणे गैरहजर होते. आ. अनुप अग्रवाल हे अगोदरच पुर्वनियोजित वैद्यकीय तपासणीसाठी मुंबईत होते तर आ.राम भदाणे यांच्या अनुपस्थितीचे कारण समजु शकले नाही.

## धुळे विभागाकडून शहादा आगाराची उपेक्षा; लोकप्रतिनिधींनी साधली चूप्पी

**शहादा,दि.११(का.प्र.)- धुळे विभागामध्ये उत्पन्नाच्या बाबतीत नेहमीच नंबर वन वर राहणाऱ्या शहादा आगाराच्या नशिबी मात्र नेहमीच उपेक्षा आणि दुय्यम वागणूक आली आहे. नवीन बस असो वा प्रवाशांच्या हिताचा कोणताही निर्णय, शहादा आगाराचा क्रमांक नेहमीच शेवटी का लावला जातो? असा संतप्त सवाल आता सामान्य प्रवाशांमधून विचारला जात आहे.**



धुळे विभागातील इतर आगारांमध्ये अत्याधुनिक सुविधा, सुधारित सेवा आणि नवीन मराजमाता जिजाऊफ बसेस दणक्यात दाखल होत आहेत. मात्र, सर्वाधिक महसूल देऊनही शहाद्यातील प्रवाशांना याच सुविधांसाठी नेहमीच ताटकळत राहावे लागते. शहादा, अक्कलकुवा, तळोदा आणि परिसरातील हजारो नागरिक, विद्यार्थी, शेतकरी, कामगार आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी एस.टी. ही केवळ (पान ४ वर)

## शिंदखेडा-मालपुर ग्रा.पं. वार्डनिहाय आरक्षण जाहीर

शिंदखेडा, दि.११ (प्रतिनिधी)- तालुक्यातील मालपूर ग्रामपंचायत सरपंच पदाचे आरक्षण सर्वसाधारण स्त्री या पदासाठी आधीच निश्चित केलेले आहे.मालपुर येथे आज महात्मा ज्योतिबा फुले सामाजिक सभागृहात मालपुर ग्रामपंचायतीचे वार्डनिहाय आरक्षण जाहीर करण्यात आले. यानुसार, प्रत्येक वार्डसाठी पुढील आरक्षण निश्चित करण्यात आले आहे.

वार्डनिहाय आरक्षणात वार्ड क्र.१ मध्ये अनुसूचित जमाती, अनुसूचित जाती, सर्वसाधारण स्त्री, वार्ड क्र.२ मध्ये ना.म.प्र.स्त्री, सर्वसाधारण स्त्री, सर्वसाधारण, वार्ड क्र. ३ मध्ये अनुसूचित जमाती, सर्वसाधारण, (पान २ वर)

## शिरपूर ता.तील शेतकऱ्यांनी पिक विमाचा लाभ घ्यावा आ. अमरिशभाई पटेल, आ. पावरा यांचे आवाहन

**शिरपूर, दि.११- शिरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त सुधारीत प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम व रब्बी हंगामाकरीता लाभ घ्यावा. त्यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी पिकविमाची रक्कम भरून शासनाचा अनुदानाचा लाभ घ्यावा असे आवाहन महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री आमदार अमरिशभाई पटेल व आमदार काशिराम पावरा यांनी केले आहे.**

गुरुवारी दि. ११ जून २०२६



रोजी धुळे येथे झालेल्या डीपीडीसीच्या बैठकीत या विषयांवर चर्चा होवून आमदार अमरिशभाई पटेल व आमदार काशिराम पावरा यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले आहे.

प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम राज्यात राबविण्यात येत आहे. सदरची योजना खरीप व रब्बी हंगामासाठी राबविण्यात आली आहे. या योजनेत नव्याने सुधारणा करून सन २०२५-२६ या वर्षाकरीता उत्पादनावर आधारीत, सुधारीत पिक विमा योजना राबविण्यास शासनाने मान्यता दिली आहे. तसेच केंद्र शासनाने देखील मॉडेल नुसार योजनेची अंमलबजावणी करण्याकरीता मान्यता दिली आहे. त्यानुसार राज्यातील अधिसूचित क्षेत्रातील, अधिसूचित पिकांसाठी, उत्पादनावर आधारीत सुधारीत प्रधानमंत्री पिक विमा योजना राज्यात राबविण्यात येत आहे.

या योजनेची उद्दीष्ट्ये :

नैसर्गिक आपत्ती, किड आणि रोगासारख्या प्रतिकूल परिस्थितीमुळे (पान २ वर)

## सशस्त्र दरोड्याचा प्लॅन चौघांना अटक साडे आठ लाखाचा मुद्देमाल हस्तगत

**नंदुरबार, दि.११ (प्रतिनिधी)- झाडाच्या आडोश्याला लपून सशस्त्र दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या चार जणांना नंदुरबार शहर पोलिस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून धारदार तलवार, लोखंडी टॉमी, चाकू, मिरची पावडरची पूड, दोरी, बियरच्या बाटल्या व ईर्टीगा कार असा एकुण ८लाख ४९ हजार ७९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी नंदुरबार शहरातील चारही जणांविरुद्ध पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

नंदुरबार येथील धुळे चौफुली ते जगतापवाडी रस्त्या दरम्यान दरोडा टाकण्यासाठी शहरातील संजयनगर भागातील चार जणांनी लुटीचा प्लॅन केला होता. सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास काळभैरव सप्लायर्स दुकानाजवळ असलेल्या एका झाडाच्या आड चार जण दरोडा टाकण्यासाठी लपून बसलेले होते. अंधार पडल्यावर सदर भागात लुट करण्याच्या तयारीत चौघे जण होते. (पान २ वर)

## हस्ती वर्ल्ड स्कूल विद्यार्थ्यांचे स्वागत

दोंडाईचा दि.११ : येथील हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित हस्ती वर्ल्ड स्कूल दाऊळ शिवार येथे हस्ती ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन कैलासजी जैन यांच्या मार्गदर्शनाने शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

यावेळी हस्ती वर्ल्ड स्कूलचे प्राचार्य जीवन सपकाळे, समन्वयिका समिना बोहरी तसेच पालक व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत माता सरस्वती यांच्या प्रतिमापूजन करण्यात आले. २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाच्या आरंभी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास व हस्ती वर्ल्ड स्कूलबद्दल कुतूहल निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांचे ढोल ताशांच्या गजरात जल्लोषात स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळेतील शिक्षकांनी नाटक सादरीकरण केले.या नाटकात विशाल पवार, आनंद पवार, मनोज बिरारे, अजय पदमर,सावन साळुंखे, विशाल बच्छाव,भूषण पवार, वैशाली महाजन, वैशाली निकुंभे समिना सय्यद या शिक्षकांनी विविध पात्र स्वीकारत नाटकाचे सादरीकरण केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सुचेता जाधव,रिटा पाटील, प्रमोद कोळी, अरवा कटलरी, पुष्पा साळवे, पूजा भावसार, विजय बैसाने, भूषण बोरसे, योगेश बागले, सचिन पाटील ,वर्षा अग्रवाल, अनु जाधव इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# अरूणकुमार वैद्य नगरात हाथ की सफाई प्लंबरने पंधरा लाखांचा मुद्देमाल लांबवला

**धुळे, दि.११- येथील साक्री रोड परिसरातील बंगल्यावर कामासाठी आलेल्या प्लंबरनेच आपल्या साथीदारांच्या मदतीने घरफोडी केल्याचे उघडकीस आले. स्थानिक गुन्हे शाखेने काही दिवसांतच गुन्ह्याचा उलगडा करीत मुख्य आरोपीला अटक केली. त्याच्याकडून सुमारे पंधरा लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला. अन्य तिघे बेपत्ता असून त्यांचा शोध सुरू आहे.**



शहरातील साक्री रोड अरुण कुमार वैद्य नगरमध्ये राम मोहनलाल हरवाणी (वय ३८) यांच्या बंगल्याचे नूतनीकरणाचे काम सुरू आहे. ३१ मेस सायंकाळी काम आटोपून मजूर निघून गेले. त्यानंतर चोरट्यांनी घरातील लाखोंचे दागिने लंपास केले. याप्रकरणी धुळे शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. धुळे शहर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस पथक या गुन्ह्याचा समांतर तपास करत होते. एलसीबीचे पोलीस निरीक्षक अभिजीत सोनवणे यांना माहिती मिळाली, त्यानुसार हा गुन्हा राजेश ऊर्फ भटु धरणीधर सहाणी रा. स्टेशन रोड, धुळे याने त्याच्या (पान २ वर)

## जि.काँग्रेस कमिटी अध्यक्षपदी करनकाळ

धुळे, दि.११- महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिळक भवन, दादर येथे धुळे जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष म्हणुन धुळे जिल्ह्यातील ज्येष्ठ काँग्रेस नेते युवराज करनकाळ यांची नियुक्ती केली.

नियुक्ती केल्याबद्दल नवनियुक्त जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष युवराज करनकाळ यांनी आभार व्यक्त केले. यावेळी सोबत प्रदेश काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष माजी मंत्री नसीम खान, प्रदेश उपाध्यक्ष व कार्यालय प्रमुख गणेश पाटील, प्रदेश काँग्रेस सरचिटणीस व धुळे शहर निरीक्षक प्रा. प्रकाश सोनवणे आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रदेश काँग्रेस कमिटीचे (पान २ वर)

# वयोश्री योजनेतून एक हजार सहाशे त्रेपन्न पात्र लाभार्थ्यांना साधनांचे मोफत वितरण

**शहादा, दि.११ (का.प्र.) - केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी राष्ट्रीय वयोश्री योजनेमुळे ग्रामीण भागातील गरजू ज्येष्ठ नागरिकांना मोठा आधार मिळत आहे. शहादा येथे या योजनेअंतर्गत तालुक्यातील १६५३ पात्र लाभार्थ्यांना ज्येष्ठ नागरिक सहाय्यक साधने आणि उपकरणांचे बुधवारी वाटप करण्यात आले.**

स्थानिक आमदार राजेश पाडवी व नंदुरबारचे खासदार गोवाल पाडवी यांच्या हस्ते हे साहित्य प्रदान करण्यात आल्याने ज्येष्ठांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य उमलले.पंतप्रधान नरेंद्र



मोदी यांनी ज्येष्ठ नागरिकांचे उतार वयातील जीवन सुसह्य व्हावे आणि त्यांना दैनंदिन कामांसाठी कोणावरही अवलंबून राहावे लागू नये, या उदात्त हेतूने राष्ट्रीय वयोश्री योजना सुरू केली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली या योजनेची प्रभावी अंमलबजावणी राज्यात केली जात आहे. याच साखळीतून शहादा येथील संत सेना नाभिक समाज मंगल कार्यालय येथे तालुक्यातील वयोवृद्ध आणि दिव्यांग बांधवांना विविध साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. विशेष शिबिरात शारीरिक व्याधींनी त्रस्त असलेल्या ज्येष्ठांची प्रथम तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत तपासणी करण्यात आली. त्यानंतर त्यांच्या गरजेनुसार साहित्याचे मोफत वितरण करण्यात आले.यात वॉकर व काठी,व्हीलचेअर,कमोड टॉयलेट चेअर,पाठीचे पट्टे आदी साहित्य वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला खासदार गोवाल पाडवी, आमदार राजेश पाडवी यांच्यासह भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रा. मकरंद पाटील, प्रदेश सदस्य विनोद जैन, वयोश्री योजनेचे महाराष्ट्र प्रमुख के.डी. गोटे, डॉ. किरण पावरा, तालुकाध्यक्ष नितीन पाटील, (पान २ वर)

## सेवा नर्सिंग इंस्टिट्युट रक्तदान शिबीर संपन्न

धुळे, दि.११- शहरातील सेवा नर्सिंग इस्टिट्युट येथे महाराष्ट्र शासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत तसेच सामाजिक जाणिवेतून भव्य रक्तदान शिबीर घेण्यात आले. निर्माण झालेल्या रक्त तुटवड्यामुळे हे शिबीर घेण्यात आले.

शिबीराचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष डॉ.राजेश अग्रवाल, व्यवस्थापकीय संचालक डॉ. कुणाल मेहता, प्राचार्य सुशिला मागरिट, उपप्राचार्य मोनाल जांभूळकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. उत्स्फुर्तपण रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांना संस्थेच्या माध्यमातून प्रोत्साहन म्हणून भेटवस्तू देण्यात आली. संस्थेच्या माध्यमातून रक्तदानासारखे अनेक समाजाभिमूख कार्यक्रम घेण्यात येतात या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे सर्व शिक्षक, कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



# धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे टॅलेंट सर्च उपक्रमाला मोठा प्रतिसाद

**शिरपूर/धुळे, दि.११- धुळे जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील गुणवंत क्रिकेटपटूंना योग्य व्यासपीठ मिळावे आणि त्यांच्यातील नैसर्गिक प्रतिभेला वाव मिळावा या उद्देशाने धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशन तर्फे जिल्हाभरात तालुकास्तरीय टॅलेंट सर्च मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे.**

या अभिनव उपक्रमाला खेळाडू आणि पालकांकडून मोठा प्रतिसाद मिळत असून, शिरपूर येथील यशस्वी आयोजनानंतर बुधवार, दि. १० जून रोजी धुळे येथील एस.व्ही.के.एम. संस्थेच्या भव्य मैदानावर टॅलेंट सर्च मोहिमेचा दुसरा टप्पा उत्साहात पार पडला. तालुकास्तरीय टॅलेंट सर्च ची मोहीम राबविण्यात येत आहे.याप्रसंगी धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सल्लागार प्रकाश पाटील, उपाध्यक्ष विक्रम राठोड, सहसचिव प्रा. सतिष मराठे, दबीर शेख, सदस्य अरविंद किल्लेदार, नरेंद्र काळमेख व निवड समितीचे सदस्य लहू पाटील (ज्यु.), राजेंद्र बारे, महिला निवड समिती चेअरमन भावना चौरसिया उपस्थित होते.

धुळे तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला असून जवळपास ३५० खेळाडूंनी नोंदणी केली आहे. (पान २ वर)

## बँक खात्यांचा गैरवापर करणाऱ्या सहा जणांवर गुन्हा, मुद्देमाल जप्त

**नंदुरबार, दि.११- शहरातील धुळे चौफुली परिसरातील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेजवळ सायबर फसवणुकीशी संबंधित प्रकरण उघडकीस आले असून, आर्थिक फायद्यासाठी स्वतःच्या नावाने बँक खाती उघडून ती फसवणूक करणाऱ्या टोळ्यांना वापरण्यास दिल्याप्रकरणी सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पोलिसांनी केलेल्या कारवाईत रेहान इस्माईल बागवान (वय २०), शाकीर शुकूर खाटीक (वय २३), अहमद शहा चांद शहा फकीर (वय १९), सागर कमू ठाकरे (वय २१), कौसेन फारुख मेमन (वय २२) तसेच नदीम सय्यद यांच्यावर कारवाई करण्यात आली. तपासात आरोपींनी आर्थिक लाभाच्या उद्देशाने बँक खाती उघडून त्यांची पासबुक, एटीएम कार्ड व इतर कागदपत्रे सायबर फसवणुकीसाठी (पान ४ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,33,300 रु.+3% GST
सोने- 24 K -1,45,500 रु.+3% GST
चांदी- 2,37,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## मुंडेच्या पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रम

धुळे, दि.११- शहरातील जुने धुळे झणझणी माता मंदिराजवळ स्व.गोपीनाथ मुंडेंच्या बाराव्या पुण्यतिथीनिमित्त लोकनेते गोपीनाथजी मुंडे साहेब चौकात प्रतिमा पूजनासह अन्नदानाचा कार्यक्रम मातोश्री वृध्दाश्रमात करण्यात आला.

या कार्यक्रमाप्रसंगी माजी महापौर चंद्रकांत सोनार, वंजारी समाजाचे अध्यक्ष संजय नाईक, रविंद्र आघाव, वंजारी युवक मंडळाचे अध्यक्ष कमलकुमार साबळे, स्वामी कुटे, राजेंद्र डोमाडे, सुहास सानप, अरूण ओगले, मिलींद धात्रक, सुरेंद्र काकडे, दिलीप कुटे, विकी काकडे, (पान ४ वर)

# म्हसावद गावात शासकीय आरोग्य सेवा उपलब्ध करून द्या- डॉ.टाटीयांचे जिल्हाधिकाऱ्यांना साकडे

**शहादा,दि.११(प्रतिनिधी)- तालुक्यातील म्हसावद हे मोठे बाजार पेठेचे गाव आहे. म्हसावद नं.२ अनकवाडे येथे उपकेंद्राची नव्याने इमारत तयार झाली आहे. या इमारतीत पाडळदे प्रा.आ.केंद्रा मार्फत २४/७ आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी वैद्यकीय आधिकारी, परिचारीकांसह मोठया प्रमाणात औषधसाठा उपलब्ध करुन देण्यात यावी. अशी मागणी डॉ.कांतीलाल टाटीया यांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी आरोग्याधिकाऱ्यांना यासंदर्भात कारवाई करण्याचे निर्देश दिलेले असतांना आता पर्यंत कोणतीही कारवाई झालेली नसल्याचे डॉ. टाटीयांचे म्हणणे आहे.**

म्हसावद गावाची लोकसंख्या पाच हजार च्या वर आहे. हे गाव परिसरातील ३५ ते ४० खेड्यांसाठी मध्यवर्ती आहे. परिसरात मोठ्या प्रमाणात आदिवासी समाजाची वस्ती आहे. म्हसावद येथील ग्रामीण रुग्णालयाची शासनाने नव्याने इमारत बांधकाम सुरु केल्याने तेथील आरोग्य केंद्र राणीपूर येथे स्थलांतरित केले आहे. शहादा-धडगांव रस्त्यावरील नवलपूर ते दरा या १५ कि.मी.अंतरावील गावांमध्ये शासकीय आरोग्य सेवा उपलब्ध नाही व या गावातील सर्व आदिवासी बांधवांना म्हसावद येथे बाजारासाठी येण्याच्या राबता आहे. आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात यावी या मागणीसाठी दि.२५ मे रोजी जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले होते. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी तांतडीने या संदर्भात कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. मात्र अद्याप (पान ४ वर)



सेंद्रिय जांभुळ
संकेत नित्या फार्मचे
उत्कृष्ट सेंद्रिय जांभुळ
उपलब्ध
* संपर्क *
वेळ : सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत
दै.आपला महाराष्ट्र कार्यालय
वीर सावरकर मार्ग-धुळे. ०२५६२-२३५३९६, २३८३९६

महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल, मुंबई व महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त,
श्री. गजानन माऊली सेवाभावी संस्था संचलित,
मा. आजितदादा पवार नर्सिंग इन्स्टिटयुट,
सेवा सुपरस्पेशालिटी ॲण्ड क्रिटीकल केअर सेंटर
मिशन कंपाऊंड, साक्री रोड, धुळे.
प्रवेश देणे सुरु
General Nursing & Midwifery (GNM)
नर्सिंग डिप्लोमा
- प्रशिक्षणाचा कालावधी - ०३ वर्ष .
- शैक्षणिक पात्रता - इयत्ता १२ वी कला / विज्ञान / कॉमर्स उत्तीर्ण, तसेच ANM अभ्यासक्रम उत्तीर्ण असणाऱ्यास प्राधान्य.
- केंद्र व राज्य शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती ( SC & ST ) या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता शैक्षणिक शुल्काची स्कॉलरशिपद्वारे १०० % प्रतिपुर्ती. ( Free Admission )
- इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता हप्त्याने शैक्षणिक शुल्क भरण्याची सुविधा उपलब्ध.
- मुलींकरीता होस्टेल व मेस सुविधा उपलब्ध .
- प्रात्यक्षिक प्रशिक्षणासाठी खान्देशातील पहिले NABH नामांकन प्राप्त २३० बेडचे सुसज्ज व अत्याधुनिक सोयीयुक्त रुग्णालय .
संपर्क:- 7972481374 / 8080963658 / 8605745076

आपला महाराष्ट्र

# नैऋत्य मोसमी पाऊस आणि संभ्रमावस्था

यंदाचा उन्हाळा नेहमीपेक्षा तीव्र होता. पुढच्या काळात याहीपेक्षा तो तीव्र असेल अशी चिन्हे दिसू लागली आहेत. वर्धा नागपूर, चंद्रपूर, अकोला या जिल्ह्यांसोबतच, मराठवाड्यातील परभणी, छत्रपती संभाजी नगर, जालना, हे जिल्हे अतिशय तप्त होते. त्या जिल्ह्यांची बरोबरी करणारा उष्मा जळगाव जिल्ह्यात होता. कधी नव्हे एवढी उष्मा नंदुरबार जिल्ह्यात होती हे तर आश्चर्य जनक म्हणावे लागेल. धुळे जिल्हा त्या तुलनेत कमी होता मात्र असे असले तरी ४३ अंश सेल्सिअस पर्यंत धुळ्याची उष्णतामान मे महिन्यात होते. सवय नसल्यामुळे तेही असह्यच होते. हा सगळा वातावरणातील बदल माणसाच्या जगण्याचे प्राधान्यक्रम बदलल्यामुळे झालेला आहे. निसर्गावरील हल्ला आणि पर्यावरणाची हानी यामुळे हवामानात प्रचंड बदल झालेले आहेत. सरकारने नेहमीप्रमाणे ३०० कोटी झाडे लावण्याचे उद्दिष्ट समोर ठेवलेले आहे. मात्र केवळ झाडे लावून पर्यावरणात वृद्धी होणार नाही. त्या झाडांची जोपासना झाली आहे की नाही, त्यांच्यामुळे जमिनीत पाणी मुरत आहे काय ? त्या पाण्यामुळे नद्या आणि नाले, विहिरी आणि पाझर तलाव जलयुक्त झाले आहेत काय ? याचा विचार दरवर्षी करोडो ने झाडे लावण्याची घोषणा करणारा सरकारनेही केलेला नाही. माझा नाना पाटेकर तसेच मकरंद अनासपुरे यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या नाम फाउंडेशनने हा विचार केलेला आहे आणि लोकांपर्यंत पर्यावरणाचे महत्त्व, पाण्याचे महत्व पोहोचविण्यात ते यशस्वी झालेले दिसतात. याप्रमाणे सबंध समाजाला ती समज केव्हा येईल ? हा प्रश्न आहे. पुढे वातावरण या आठवड्यात बदलले. कधी ऊन तर कधी सावली असा खेळ सुरू झालेला असला तरी संपूर्ण महाराष्ट्रात नैऋत्य मोसमी पाऊस पोहोचलेला नाही त्यामुळे काळजी आहे.आज अकरा जून आहे. साधारणपणे सात जूनला मृग नक्षत्राच्या मूहूर्तावर पावसाळा सुरू होतो. तत्पूर्वी शेतकऱ्यांनी जमिनीची मशागत केलेली असते. काही ठिकाणी रोहिणी नक्षत्र हजेरी लावतो परंतु यावर्षी मात्र मृग उलटून गेला तरी तापमान काही कमी झालेले नाही.

एल निनोचा प्रभाव मान्य आहे. पण याबाबत शास्त्रज्ञांचे देखील एकमत दिसत नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्वसामान्य शेतकरी जो कोरडवाहू जमिनीवर आपला निर्वाह करतो तो संभ्रमात आहे. सरकारने सांगितले की पेरणीची घाई करू नका. पंतप्रधान सांगतात की रासायनिक खते वापरू नका. कृषी तज्ञ म्हणतात की, नवे बियाणे वापरा. वेगवेगळी खते वापरा. अमुक तमुक कीटक नाशके वापरा. कंपन्या त्यांचा माल खपवण्यात मग्न असतात. मात्र यावर्षी सर्वच बाबतीत संभ्रम दिसतो. एल निनो चा हवाला देऊन हवामान खात्याने आणि त्यावर हुकूम सरकारने एकदा सरासरीच्या ९० टक्के पाऊस यावर्षी सांगितला. नंतर ९५ टक्के सांगितला. परवा एका हवामान तज्ज्ञाने ९८ टक्के पाऊस सांगितला. हवामान खात्याच्या अंदाजानुसार सहा जूनला दक्षिण कोकणात मान्सून दाखल झाला. त्यानंतर आठ जूनला दक्षिण मध्य महाराष्ट्रात तो धडकणार असल्याची आणि मुंबईत दाखल होणार असल्याची घोषणा हवामान खात्याने केली होती. पण दहा तारीख उलटून गेली तरी मुंबईत पाऊस आला नाही किंवा दक्षिण मध्य महाराष्ट्रातही आलेला नाही. सांगलीला ,धाराशिवला आणि सोलापूरला बऱ्यापैकी पाऊसाने हजेरी लावली. त्यात वादळाचा समावेश आहे. हे तिन्ही जिल्हे दक्षिण मध्य महाराष्ट्रातील आहेत मात्र तरीही मोसमी पाऊस या तिन्ही जिल्ह्यात झाला असे म्हणता येत नाही असे तज्ञांचे म्हणणे आहे. याचा अर्थ हा मान्सूनपूर्व पाऊस आहे का या प्रश्नाचे उत्तरही मिळत नाही. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे एल नेनो बाबत संशोधकांचे एकमत नाही. म्हणजे पावसाच्या टक्केवारीबाबत एक मत नाही. म्हणूनच संभ्रम कायम आहे. आपल्याकडे अलीकडे हवामान अभ्यासकांची संख्या खूप वाढली आहे. मराठवाड्यातील एका हवामान तज्ज्ञाचे अंदाज महाराष्ट्रातील सर्व शेतकरी अमलात आणतात. पण शासकीय हवामान खात्याच्या अंदाजावर भरवसा ठेवत नाहीत.

वास्तविक शासनाचे हवामान खाते आणि त्या खात्याकडे असलेली आधुनिक साधने ही कुठल्याही व्यक्तिगत पातळीवर हवामानाचे अंदाज व्यक्त करणाऱ्या व्यक्तीकडे असू शकत नाहीत. एखादा भविष्यकार शंभर लोकांना भविष्य सांगतो आणि त्यातील दहा लोकांचे भविष्य खरे ठरते. ते दहा लोक संबंधित भविष्यकाराची भरपूर प्रसिद्धी करतात आणि त्यामुळे लोकांचा ओघ त्याच्याकडे वाढतो. त्याचा व्यवसाय होतो तसे या खाजगी हवामान तज्ज्ञाचे आहे. खरेतर लोकांनी विवेकाचा वापर याबाबतीत केला पाहिजे. पण तसे घडत नाही हे दुर्दैव आहे. खरोखरच जर यंदा पावसाची परिस्थिती अशीच राहिली तर फार वाईट दिवस येणार आहेत. सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न महाराष्ट्रा समोर उभा राहील. त्याचे नियोजन नेमके काय असेल ? यासंबंधी सरकारचा कुठलाही आराखडा आजपर्यंत प्रसिद्ध झालेला नाही. जे काही सांगितले ते मुख्यमंत्र्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. त्यातून चित्र काही स्पष्ट होत नाही. नेमके नियोजन नाही केले तर पिण्याच्या पाण्यासोबतच शेतीच्या पाण्याचा प्रश्न राहणार आहे आणि अन्नधान्य तसेच नगदी पिके धोक्यात येतील. धरणांनी तर आजच तळ गाठला आहे. परंतु पाऊस पडणारच नाही अशी स्थिती नाही. मात्र पहिल्याच पावसात किंवा त्यानंतरच्या दुसऱ्या पावसात जे पाणी वाहून जाते ते धरणात अडविण्याचे काम झाले पाहिजे. अतिरिक्त पाणी असेल तर आजूबाजूचे पाझर तलाव, छोटे प्रकल्प भरून घेतले पाहिजेत. म्हणजे त्या परिसरातील विहिरींना पाणी येईल. आणि पुढच्या पावसापर्यंत त्या पाण्याचा वापर करता येईल. अजूनही आपल्याकडे ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या योजना राजकीय पातळीवर देण्यात येतात. अशी असंख्य गावे आहेत की त्या गावांना दरवर्षी नवीन योजना तयार करून पाणी द्यावे लागते. दहा ते बारा गावांचे गट एकत्रित करून देखील पाणीपुरवठ्याच्या योजना आहेत त्या सगळ्या फेल झालेल्या आहेत. म्हणून गाव घटक मानून ज्या गावाच्या बोरी त्याच गावाच्या बाभळी या म्हणीप्रमाणे गावाच्या आसपास जे स्त्रोत असतील तेच विकसित केले पाहिजेत.

गावचा नाला किंवा गावची नदी सोडून ५०- ६० किलोमीटर वरून धरणातून पाणी आणण्याचे नियोजन चुकीचे आहे. धरण आटले तर तुम्ही तहानलेले आणि आम्हीही तहानलेले अशी अवस्था निर्माण होणार आहे. विदर्भातील खूप मोठा भूप्रदेश कोरडा आहे. दूरवर जिथे नजर टाकाल तिथे पूर्ण जमीन कोरडी दिसेल. एकाही शेतात बागायत नाही. कुठे धरण दिसत नाही ,नदी दिसत नाही, विहिरी दिसत नाहीत. त्या शेतकऱ्यांनी आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या घटकांनी कसे जगावे ? हा प्रश्न आहे. म्हणूनच एल निनो च्या पार्श्वभूमीवर अतिशय काटेकोरपणे नियोजन झाले पाहिजे. पावसाळा आला की सर्वत्र हिरवाई बघण्याची आपल्याला सवय आहे. पण अजून काही तसे चित्र दिसत नाही. पावसावरच्या परंपरागत कविता भरपूर आहेत. काही गाणी ही आहेत. मराठीत आहे तशी हिंदीतही आहेत. हिंदी चित्रपट सृष्टीत तर पाऊस या विषयावर भरपूर काही दिसेल. पाऊस पडताच हिरवळ दिसली की नवकवींचे काव्य हमखास समाज माध्यमांवर आढळते. त्यातील बऱ्याच कविता चांगल्या असतात. साहित्यिक भूक भागविणाऱ्या असतात. हा शेवटी सृष्टीचा महिमा आहे. त्यात जीवनाचा आनंद घेणारा मोठा वर्ग आहे. तर व्यावहारिक पातळीवर पावसाच्या उपयोगीतेचा सुद्धा विचार करणारा फार मोठा वर्ग आहे. या सर्वांनाच पावसाची प्रतीक्षा आहे. साधारणपणे जुलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत महाराष्ट्रातील सर्व पेरण्या पूर्ण होतात. जून अर्धा झाला आणि अर्धा बाकी आहे. या पंधरा दिवसात भरपूर पाऊस पडेल आणि जमिनीची तहान भागेल. पेरणी पूर्ण होईल. ती पूर्ण होऊन कृषीवलांना समाधान लाभेल अशी भाकिते तज्ज्ञांनी केली पाहिजे अशी अपेक्षा आहे. हवामान अंदाजातील विसंगती आणि शेतकऱ्यांचा संभ्रम हा अलीकडच्या काळातील ऐरणीवरचा विषय असून शेतकरी एकीकडे, दुसरीकडे तज्ज्ञ, तिसरीकडे सरकार आणि चौथी कडे प्रत्यक्षात जी परिस्थिती असते ती आहे. म्हणूनच पाणी नियोजनातील दीर्घकालीन त्रुटी दूर करणे सर्वांत प्राधान्य क्रमाचे आहे. पावसाकडे केवळ काव्यात्मक नव्हे तर जीवनाधार म्हणून पाहण्याची गरज आहे. ज्या गावच्या बोरी त्याच गावाच्या बाभळी हे जलव्यवस्थापनाचे खरे तत्त्व आहे. गेल्या काही दशकांत मोठ्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांवर भर दिला गेला; पण स्थानिक जलस्रोत, नाले, ओढे, तलाव, शेततळी आणि विहिरींच्या पुनर्भरणाकडे तुलनेने कमी लक्ष दिले गेले. त्यामुळे एखादे मोठे धरण कोरडे पडले की संपूर्ण प्रदेश संकटात सापडतो. तसेच खाजगी हवामान तज्ज्ञांविषयीची निरीक्षणेही विचार करण्यासारखी आहेत. हवामानशास्त्र हे संभाव्यतेचे विज्ञान आहे; ते शंभर टक्के भविष्यवाणी करू शकत नाही. परंतु लोक अनेकदा ज्या अंदाजाचा योगायोगाने अचूकपणा दिसतो त्यालाच अंतिम सत्य मानतात. त्यामुळे वैज्ञानिक दृष्टीकोनाऐवजी व्यक्तिनिष्ठ विश्वास वाढतो.महाराष्ट्राच्या कृषी इतिहासात अनेक वेळा मान्सून उशिरा सक्रिय झाला आणि नंतर समाधानकारक पाऊसही झाला आहे. त्यामुळे चिंता असली तरी घबराटीचे कारण नाही. मात्र प्रशासनाने पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा, जलसंधारण आणि पेरणीचे नियोजन याबाबत पर्यायी आराखडे तयार ठेवले पाहिजेत. पावसावर कविता करणारा आणि पावसावर जगणारा या दोघांनाही आज पावसाचीच प्रतीक्षा आहे. दोघांच्याही अपेक्षा लवकर पूर्ण होवोत अशा सदिच्छा.

## पान १ वरुन

## अरूणकुमार वैद्य नगरात हाथ की सफाई

साथीदारासह केला असून, तो चोरीचा माल विकण्यासाठी चक्करबर्डी पाण्याच्या टाकीजवळ मोटारसायकलसह उभा आहे, अशी माहिती मिळाली. त्यानुसार उपनिरीक्षक अमित माळी यांच्यासह पोलीस पथकाने चक्करबर्डी परिसरात सापळा रचला. संशयित राजेश ऊर्फ भटूला ताब्यात घेतले. पोलिसांनी पोलिसी खाक्या दाखवताच प्लंबिंग व्यावसायीक त्याने गुन्ह्याची कबुली दिली. फिर्यादी राम हरवाणी यांच्या घरात त्यानेच प्लंबिंगचे काम केले होते. घरात कुठे काय ठेवले आहे याचा अंदाज आल्याने, त्याने साथीदार शैलेश राजु राखुंडे रा. पवन नगर, चाळीसगाव रोड, धुळे, विवेक ऊर्फ दादु गजानन भाबड रा. शिवशक्ती कॉलनी, धुळे, अमोल ऊर्फ सोनु ऊर्फ ढोक्या रामकृष्ण धीनभादुर रा. अमरनगर, धुळे या तिघांच्या मदतीने रात्री बंगल्यात प्रवेश केला. सोन्या-चांदीचे दागिने चोरी केल्याची कबूली दिली. मुख्य आरोपी राजेश सहाणी याच्याकडून सोने-चादींचे दागिने, गुन्ह्यात वापरलेली दुचाकी एकूण चौदा लाख सत्त्याणव हजार सातशे रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला. या गुन्ह्यातील अन्य तिघे साथीदार बेपत्ता असुन शोध सुरू आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक अभिजीत सोनवणे, सहाय्यक निरीक्षक नामदेव सहारे, उपनिरीक्षक अमित माळी पथकातील मच्छिंद्र पाटील, हेमंत बोरसे, दिनेश परदेशी, योगेश चव्हाण, प्रल्हाद वाघ, प्रकाश सोनार यांनी कारवाई केली.

## वयोश्री योजनेतून एक हजार सहाशे त्रेपन्न

विश्वास ठाकरे, मोतीलाल जैन, विवेक पाडवी, महिला मोर्चा शहराध्यक्ष वंदना भावसार, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस प्रशांत कुलकर्णी, सुनील चव्हाण, सुभाष वाघ, शहर महामंत्री प्रशांत कदम, अजबसिंग गिरासे, स्विय्य सहाय्यक हेमराज पवार, अनिल ठाकरे, प्रितेश भावसार यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शासनाच्या या थेट मदतीमुळे वयोवृद्ध नागरिकांनी मनापासून समाधान व्यक्त करत सरकारचे आभार मानले.

## धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे

१० जून रोजी १४ वर्षाखालील व १६ वर्षाखालील खेळाडूची चाचणी घेण्यात आली. अनुभवी आणि तज्ज्ञ निवडकर्त्यांनी प्रत्येक खेळाडूची स्वतंत्रपणे पाहणी करून त्यांची गुणवत्ता तपासली. या मोहिमेच्या पुढील टप्प्यात दि. ११ जून रोजी १९ वर्षांखालील, २३ वर्षांखालील, खुला गट तसेच महिला खेळाडूंच्या निवड चाचण्या आयोजित करण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील अधिकाधिक गुणवंत खेळाडूंना संधी मिळावी यासाठी ही निवड प्रक्रिया पारदर्शक आणि गुणवत्तेच्या आधारे राबविण्यात येत असल्याचे आयोजकांनी सांगितले. धुळे नंतर पुढील टप्प्यात दि. १३ जून रोजी दोंडाईचा येथील हस्ती पब्लिक स्कूल येथे टॅलेंट सर्च चे आयोजन करण्यात आले आहे. धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल व सल्लागार तथा माजी आमदार राजवर्धन कदमबांडे यांनी धुळे तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर खेळाडूंचा प्रतिसाद मिळाल्याने समाधान व्यक्त केले.




## जिल्हाधिकारी कार्या.त महिला लोकशाही दिन

नंदुरबार, दि.११- नंदुरबार जिल्ह्यातील समस्याग्रस्त आणि पीडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळावे, तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन त्यांना तातडीने न्याय मिळावा यासाठी शासन निर्णयानुसार दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी जिल्हास्तरावर महिला लोकशाही दिन आयोजित केला जातो. त्यानुसार, जून महिन्यात दि.१५ जून २०२६ रोजी दुपारी १:०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील रंगावली सभागृह येथे महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संजय पाटील यांनी कळविली आहे.

समाजातील पीडित महिलांच्या तक्रारी आणि अडचणी शासकीय यंत्रणेकडून तातडीने सोडवल्या जाव्यात आणि त्यांना सुलभ मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. तक्रारदार महिलांनी आपले तक्रार अर्ज घेऊन १५ जून रोजी दुपारी १ वाजेपर्यंत रंगावली सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार येथे स्वतः उपस्थित राहावे. ज्या महिलांना प्रत्यक्ष येणे शक्य नाही, त्यांनी गुगल मीट लिंकच्या माध्यमातून दुपारी १ ते २ या वेळेत ऑनलाईन उपस्थित राहून आपली तक्रार मांडावी. महिला लोकशाही दिनामध्ये मांडण्यात येणारी तक्रार ही केवळ वैयक्तिक स्वरूपाची असावी. न्यायालयीन प्रविष्ट (न्यायप्रविष्ठ), आस्थापना विषयक किंवा सामूहिक स्वरूपाच्या तक्रारी या ठिकाणी स्वीकारल्या जाणार नाहीत, याची सर्व तक्रारदार महिलांनी नोंद घ्यावी, असेही आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी पाटील यांनी केले आहे.

## महाराणा प्रतापसिंह जन्मोत्सव कार्यकारणी

नंदुरबार, दि.११(प्रतिनिधी)- वीर शिरोमणी महाराणा प्रताप सिंह यांच्या जन्मोत्सवानिमित्त १७ जून रोजी नंदनगरीत मिरवणुकीसह भव्य दिव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जन्मोत्सवानिमित्त कार्यकारणी गठीत करण्यात आली आहे.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी महाराणा प्रतापसिंह युवक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष आणि राजपूत समाज अध्यक्ष मोहिनीराज राजपूत होते. उत्सव समिती कार्यकारणी अध्यक्षपदी विपुल हेमंतसिंग राजपूत, उपाध्यक्षपदी राजेंद्र भोलेसिंग राजपूत, सचिव चेतन पंडित राजपूत, खजिनदार विशाल राजपूत, सभासद सुनील राजपूत, अजय राजपूत, उपेंद्र राजपूत, हेमंत राजपुत, गणेश राजपूत, राजेंद्र राजपुत, कैलास राजपुत, राजभूषण राजपूत, यांचा समावेश आहे.

## पान १ वरुन

## शिरपूर ता.तील शेतकऱ्यांनी पिक विमाचा लाभ घ्यावा

पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे, पिकांच्या नुकसानीच्या अंत्यत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखणे, शेतकऱ्यांना नाविण्यपूण व सुधारीत मशागतीचे तंत्रज्ञान व सामुग्री वापरण्यास प्रोत्साहन देणे, कृषि क्षेत्रासाठीच्या पत पुरवठ्यात सातत्य राखणे, जेणेकरून उत्पादनातील जोखमींपासून शेतकऱ्यांच्या संरक्षणाबरोबरच अन्नसुरक्षा, पिकांचे विविधीकरण आणि कृषी क्षेत्राचा गतिमान विकास व स्पर्धात्मकतेत वाढ होण्यास मदत होईल. त्यामुळे शेतकऱ्यांनी या योजनेअंतर्गत विमा हप्ता खरीप हंगामासाठी २ टक्के, रब्बी हंगामासाठी १.५ टक्के तसेच खरीप व रब्बी हंगामातील नगदी पिकांसाठी ५ टक्के असा मर्यादित विमा भरावा लागणार आहे. या योजने अंतर्गत खरीप हंगाम व रब्बी हंगाम या एका वर्षाकरीता सर्व अधिसूचित पिकांसाठी जोखिमस्तर ७० टक्के निश्चित करण्यात आले आहे. अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांचे उंबरठा उत्पादन हे मागील ७ वर्षापैकी सर्वाधिक उत्पादनाच्या ५ वर्षांचे सरासरी उत्पादन गुणिले त्या पिकाचा जोखिमस्तर विचारात घेतला जाणार आहे.

**विमा संरक्षण प्रति हेक्टरी**

शासनाने बहुतांशी सर्वच पिकांना जोखीमस्तर हेक्टरी ७० टक्के जाहिर केले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी हेक्टरी ज्वारी ८२.५०, बाजरी २४०, नाचणी ९५, भुईमूग ११२.५०, सोयाबील १३ हजार ७५०, तीळ ६७.५०, मूग ७०, उडीद ६२.५०, तूर ११७.५०, कापूस ९००, मका ३६०, कांदा १७०, ज्वारी जिराइत ९०, गहू बागायती पिकासाठी ४५० रूपये, हरभरा ३६०, उन्हाळी भुईमूग १०१.५०, रब्बी कांदा २२५ रूपये विमा हप्ता रक्कम भरणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांनी पिक विमाचा लाभ घेतल्यास नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाकडून या पिकांसाठी संरक्षित रक्कम प्राप्त होणार आहे. शिरपूर तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन राज्याचे माजी शिक्षणा मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम पावरा, प्रियदर्शिनी सहकारी सूतगिरणीचे चेअरमन भूपेशभाई पटेल यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी कैलास गोपाळ यांच्याशी संपर्क साधावा असे कळविण्यात आले आहे.

## सशस्त्र दरोड्याचा प्लॅन चौघांना अटक

परंतू नंदुरबार शहर पोलिस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने आकाश बाबुलाल धनगर, शंकर गिरधर मराठे, योगेश रविंद्र मराठे, अनिल मंगल शिंदे (वडर) या चार जणांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून दरोडा टाकण्यासाठी जवळ बाळगलेली १५०० रुपयांची तलवार, २०० रुपयांची लोखंडी टॉमी, चाकू, मिरची पावडरची पूड, दोन दोरी, अर्धवट भरलेल्या बियरच्या बाटल्या, पाच हजाराचा मोबाईल, ४३ हजार ९० रुपयांची रोकड व ८ लाखाची ईर्टीगा कार (क्र. एमएच ०२ सीअ-र ४३०३) असा एकुण ८ लाख ४९ हजार ७९० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

याबाबत पोकॉ. विशाल राजेंद्र मराठे यांनी नंदुरबार शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार आकाश बाबुलाल धनगर रा. संजयनगर, ८ नंबर शाळा नंदुरबार, शंकर गिरधर मराठे रा. मोठामारुती टेकडीजवळ, नंदुरबार, योगेश रविंद्र मराठे, अनिल मंगल शिंदे वडर, रा. संजयनगर टेकडी, नंदुरबार या चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलिस उपनिरीक्षक भुनेश मराठे करीत आहेत.

## शिंदखेडा-मालपुर ग्रा.पं. वार्डनिहाय आरक्षण जाहीर

वार्ड क्र.४ मध्ये अनुसूचित जमाती स्त्री, सर्वसाधारण स्त्री, सर्वसाधारण, वार्ड क्र.५ मध्ये अनुसूचित जमाती स्त्री, ना.म.प्र. , सर्वसाधारण स्त्री, वार्ड क्र.६ मध्ये अनुसूचित जाती स्त्री, सर्वसाधारण स्त्री,सर्वसाधारण आदिंचा समावेश आहे.


त्याप्रसंगी महसूलच्या कर्तव्यदक्ष महिला अधिकारी रेणुका राजपूत, मालपूर सजा चे तलाठी नारायण मांजोळकर, क. परसोळे सजा चे तलाठी वैभव सैंदाणे, ग्राम विस्तार अधिकारी आर.बी. वाघ, ग्रामस्थ उपस्थित होते. गावातील निवडणुकीपूर्वीच वार्डनिहाय आरक्षण जाहीर केल्यामुळे नागरिकांना निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेची खात्री मिळणार आहे.

## जि.काँग्रेस कमिटी अध्यक्षपदी करनकाळ

अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत संघटन सृजन कार्यक्रम अंतर्गत धुळे जिल्हा ग्रामीण व शहराचे नवनियुक्त तालुका अध्यक्ष, विविध सेल प्रमुखांच्या, तसेच जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती संदर्भात टिळक भवन काँग्रेस कार्यालयात धुळे जिल्हा काँग्रेस ग्रामीण चे अध्यक्ष युवराज करनकाळ व धुळे शहर निरीक्षक प्रा. प्रकाश सोनवणे यांच्या सोबत सखोल चर्चा झाली. तसेच लवकरच जिल्हा ग्रामीण व शहर पदाधिकाऱ्यांचे नियुक्तीची यादी सादर करण्याबाबत दोन्ही पदाधिकाऱ्यांना आदेश देण्यात आलेत.

रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

प्रकाश में आज
मुकद्दर का सिकंदर




अमिताभ,रेखा विनोद खन्ना, राखी अमजद खान कादरखान रंजीत गोगाकपूर

## शब्दकोडे क्रमांक : २३८५



**आडवे शब्द :** १. जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढण्याची आर्थिक स्थिती ४.मध्यान्हाची वेळ किंवा दिवसा १२ नंतरचा काळ ६. पुस्तक, ग्रंथ किंवा वृत्तपत्र वाचणारी व्यक्ती १०. विजयादशमी, साडेतीन मुहूर्तांपैकी एक ,एक मोठा हिंदू सण १२. थंड, गार किंवा बर्फासारखे शीतल १४. अत्यंत लहान क्षण किंवा वेगाने धावण्याची क्रिया १५. अंधार, काळोख किंवा शोक १७. टपोरी किंवा गुंड प्रवृत्तीची व्यक्ती १९. हाडांचा सांगाडा किंवा प्राण्यांना पकडण्याचे साधन २२.जहेल-उलट लिहा २४. वजनाचे मोठे माप (१० क्विंटल किंवा १००० किलो) २६. पोलिस आणि गुंडांमधील लढाई २८.पावसाची येणारी झड किंवा शिक्षकांना मारलेली हाक ३०. बोलण्याची शक्ती, वाणी किंवा जीभ ३१. मृत्यूचा देव किंवा प्राणांचे हरण करणारा ३२.पत्रव्यवहार, चिठ्ठ्या किंवा पोस्टाचे सामान३४.ज्याला कधीही वृद्धत्व आणि मृत्यू येत नाही असा ३५.सुट्टी, रजा किंवा कामावरून घेतलेली विश्रांती ३७.आकाश, नभ, अंबर किंवा अंतराळ ४१.हुबेहूब केलेली कॉपी किंवा मिमिक्री ४२.अंगीकारलेले व्रत, नियम किंवा पूर्वजांचा वारसा ४५. चांगले कार्य ४७. वर्तुळाकार ४८. ळगरभ-उलट लिहा ४९. लग्नाचा मुलगा (नवरदेव) किंवा वरची दिशा ५०. लहान मुलांची घेतलेले चुंबन ५१. परिस्थितीनुसार स्वतःचा रंग बदलणारा सरपटणारा प्राणी ५२. केस विंचरण्यासाठी वापरला जाणारा कंगवा ५३. डुंबणारा,उगवता-विरुद्ध ५५.तोंडातून गळणारा पाचक द्रव ५६. लपूनछपून काम करणारा किंवा चोरीची प्रवृत्ती असलेला ५७. सांभाळ **उभे शब्द :** १. करमणूक २. कष्ट, यातना किंवा हालअपेष्टा,दैना ३. एक मुस्लिम सण ४. दोन व्यक्तींमधील वाढलेले अंतर किंवा अलिप्तता ५. दोरी ७. वीज ८. भांडणाचा मुद्दा ११. बुद्धी, आकलन किंवा गैरसमज दूर करणे १३. त्याप्रमाणे १६. जखमेवर लावण्याचे औषध १८.द्रव पदार्थ मोजण्याचे एकक २०.पंख असलेली कल्पनेतील सुंदर स्त्री.२१. साठा २३. आपलेच बोलणे खरे मानणारा २५. मंथन २७.भारताचे राष्ट्रीय फूल २८. अतूट २९.दक्ष ३०.परमेश्वराचा एक बटू अवतार ३३. वेडा ३६. पशू ३८.अद्भूत गोष्ट किंवा मनाला वाटणारे आश्चर्य ३९.आकाश ४१. धुळीचा बारीक अंश विस्मयकारक घटना.४३. शुष्क ४४. बंड ५०.एक शेंग भाजी ५२.हिंदीत-फळ ५३. चोप ५४. ज्वर ५५. हिंदीत- मृतदेह

## शब्दकोडे क्रमांक : २३८४ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जी | व | न | | स | न | द | | पो | त | रा | ज |
| त | ज | वी | ज | | र | | क | प | ट | | ल |
| | न | | हा | त | मा | ग | | ट | | मे | द |
| क | | का | ल | | ई | | कि | | वा | घ | |
| स | ला | म | | प | | भ | र | पू | र | | भा |
| र | ग | | श | र | द | | ण | | सा | ह | स |
| | व | सा | ह | त | | त | | ग | | ल | |
| ता | ड | | र | | फे | र | प | री | क्षा | | वि |
| ट | | श | | ढ | | स | | ब | | दा | दा |
| | श | र | म | | स | | स | | मि | र | र |
| क | र | म | | क | द | र | दा | न | | बा | क |
| | ण | | आ | स | मा | न | | वा | द | न | |






## पान १ वरुन

### अमेरिकेने इराणवर एकोणपन्नास क्षेपणास्त्र हल्ले

बहरीनचा शेख ईसाफ हवाई तळ आणि इराकच्या इरबिलमधील एअरबेससह एकूण १९ तळांवर इराणच्या जॉइंट मिलिटरी कमांडने मोठा मारा केला. या हल्ल्यानंतर कुवेत, बहरीन आणि जॉर्डनमध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. कुवेतमध्ये धोक्याचे सायरन वाजवण्यास सुरुवात झाली आहे. बहरीनच्या गृह मंत्रालयाने नागरिकांना तात्काळ सुरक्षित ठिकाणी जाण्याचे आवाहन केले आहे.

**होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे बंद**

या युद्धाचा सर्वात मोठा फटका जागतिक तेल व्यापाराला बसण्याची शक्यता आहे. इराणने होर्मुझची सामुद्रधुनी सर्व प्रकारच्या ऑईल टँकर्स आणि व्यापारी जहाजांसाठी पूर्णपणे बंद केली आहे. इराणच्या लष्कराने इशारा दिला आहे की, या भागात आलेले कोणतेही जहाज उडवले जाईल. त्यामुळे आंतरराष्ट्रीय जहाजांनी ती आता स्वतःच्या जबाबदारीवर उतरवावीत. इराणच्या या घोषणेनंतरही अमेरिकी सेंट्रल कमांडने व्यापारी जहाजांची वाहतूक अजूनही सुरू असल्याचा दावा केला आहे. दरम्यान, इराणच्या केशम बेट, बंदर अब्बास आणि सीरिक शहरांमध्येही भीषण स्फोटांचे आवाज ऐकू आले आहेत.

**संयुक्त राष्ट्रांचा गंभीर इशारा**

या संपूर्ण परिस्थितीवर संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरस यांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. पश्चिम आशियातील प्रदेश एका मोठ्या विनाशाकडे आणि खोल संकटाकडे ढकलला जात आहे. सध्याची परिस्थिती ही युद्ध विरामाची नसून थेट युद्धाचीच दिसते आहे, असे सांगत त्यांनी सर्व देशांना तात्काळ हल्ले थांबवून मुत्सद्देगिरीचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन केले आहे.

**भारताने हल्ल्याचा केला निषेध**

दरम्यान, भारत सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाने आज जारी केलेल्या एका वक्तव्यात ओमानच्या किनाऱ्याजवळील व्यावसायिक जहाज सेटेबेल्लोवर झालेल्या हल्ल्याची तीव्र निंदा केली आहे. या जहाजावर २४ भारतीय कर्मचारी होते, त्यापैकी २१ जणांची आतापर्यंत सुटका झाली असून ३ भारतीय अजूनही बेपत्ता आहेत. परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे की, आम्ही ओमानच्या किनाऱ्याजवळ आज सकाळी व्यावसायिक जहाज सेटेबेल्लोवर झालेल्या हल्ल्याचा निषेध करतो. आमचे ओमानमधील दूतावास परिस्थितीवर बारकाईने लक्षात ठेवत आहे.

### राज्यात मान्सून लांबला पाच दिवसांनी परतणार

कलबुर्गी, आंध्र प्रदेशातील नंद्याल, तामिळनाडूतील चेन्नई आणि पश्चिम बंगालमधील सिलिगुडी परिसरापर्यंत पोचली आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये मान्सूनपूर्व सरी आणि हलका पाऊस सुरू असला तरी राज्यातील अनेक भाग अद्यापही पावसाच्या प्रतीक्षेत आहेत.

### जिल्ह्याच्या सर्वसमावेशक विकासासाठी प्रयत्न करावेत

विभागप्रमुख उपस्थित होते. पालकमंत्री रावल म्हणाले की, यंदाच्या जिल्हा वार्षिक योजनेतून मंजूर करण्यात आलेल्या निधीचा प्रभावी वापर करून विकास कामे वेळेत पूर्ण करावीत. नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन सर्व तालुक्यातील लोकप्रनिधीशी समन्वय साधून विकासकामांचे नियोजन, योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि गुणवत्ता राखून विकास कामे पूर्ण करावीत. सर्व तालुक्यातील विकासकामे होतील यासाठी सर्व यंत्रणांनी नियोजनपूर्वक आणि समन्वयाने कामे करावे.

शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य बाजारभाव मिळावा तसेच कृषी मालाचे स्थानिकस्तरावर मूल्यवर्धन व्हावे यासाठी जिल्ह्यात मिलेट, सोलर, कृषीवर आधारीत फूड प्रोसेसिंग युनिट्स उभारण्यावर भर देण्यात यावा. जिल्हा वार्षिक योजनेतून राबविण्यात येणाऱ्या विविध विकास कामांचे भूमिपूजनासाठी लोकप्रतिनिधींना आमंत्रित करावे. जिल्ह्यात वन विभागाने वृक्ष लागवड करीत वनाच्छादान वाढवावे. जिल्ह्यातील बंधारे, प्रकल्प, धरणामधील गाळ काढण्यात यावा. नवीन शाळांचे बांधकाम करतांना स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी अशा मूलभूत सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात.

प्रत्येक तालुक्यात वीज प्रतिबंधक यंत्रे बसविण्यात यावेत. पुनर्वसित गावांचे प्रश्न सोडविण्यासाठी नियमित आढावा घेण्यात यावा. तालुकास्तरावर समन्वय समितीची बैठक घेण्यात यावी. संपूर्ण जिल्ह्यात वन पर्यटन विकास, इको टुरिझमचे कामे करावीत. सर्व शासकीय कार्यालये, शाळा,आश्रमशाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र येथे सौर संयंत्र बसविण्यात यावेत. असेही निर्देश पालकमंत्री श्री.रावल यांनी दिले.यावेळी खासदार डॉ. बच्छाव, आमदार श्री.पटेल , आमदार श्री.पावरा, आमदार श्रीमती गावित यांनी विविध विषयांच्या चर्चेत सहभाग घेऊन विविध सूचना केल्या.

जिल्हा नियोजन अधिकारी सोनार, आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी पवार, समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त श्री. नांदगावकर यांनी सादरीकरण केले.

या बैठकीत २२ जानेवारी, २०२६ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता, जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२०२६ मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देणे, तसेच जिल्हा वार्षिक योजना मार्च, २०२६ अखेर खर्चास मान्यता देण्यात देणे. जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ सर्वसाधारण योजना, आदिवासी उपयोजना, अनुसूचित जाती उपयोजना च्या खर्चाचे नियोजनावर चर्चा करण्यात आली.

### धुळे विभागाकडून शहादा आगाराची

गाडी नसून जीवनवाहिनी आहे. असे असताना नवीन बसेसच्या वाटपात शहादा आगाराला सावत्रपणाची वागणूक का दिली जात आहे? शहादा आगाराने नक्की कोणाचे घोडे मारले आहे? असा सडेतोड प्रश्न आता जनता विचारत आहे.सध्या शहादा बस स्थानकाची प्रचंड दुरावस्था झाली असून प्रवाशांना नरकयातना सहन कराव्या लागत आहेत. विशेष म्हणजे एसटी महामंडळाकडे शहाद्यात तीन ठिकाणी कोट्यवधी रुपयांची मोक्याची जागा उपलब्ध आहे. पण, अधिकाऱ्यांच्या नाकर्तेपणामुळे या मालमत्तेची वाट लागली आहे.सध्याच्या बसस्थानक परिसरात डोंगरगाव रस्त्यावरील जागेवर आज घडीला प्रचंड झाडे-झुडपे उगवली असून ही जागा पूर्णपणे बिनकामाची पडून आहे.बायपास रस्त्यावर कोट्यवधी रुपये खर्च करून उभारलेली भव्य इमारत आणि जागा केवळ वापराअभावी पडून आहे.येथे प्रशिक्षण केंद्र सुरू होणार असल्याच्या फक्त वल्गना केल्या गेल्या, प्रत्यक्षात आज ती जागा विनावापर पडून धूळ खात आहे. कमाई करून देणाऱ्या शहादा आगाराला इतर आगारांप्रमाणे समान न्याय मिळालाच पाहिजे. ही मागणी कोणावर टीका करण्यासाठी नाही, तर शहाद्याच्या हक्कासाठी आहे अशी प्रतिक्रिया त्रस्त प्रवासी व्यक्त करत आहेत.शहाद्याच्या या बसस्थानक दुरावस्थेला जेवढे धुळे विभागीय कार्यालयातील अधिकारी जबाबदार आहेत, तेवढेच येथील लोकप्रतिनिधीही जबाबदार आहेत. या गंभीर समस्येवर स्थानिक आमदार आणि खासदारांनी गुळगुळीत चूप्पी साधली आहे. जनतेच्या मतांवर डोळा ठेवणारे नेते आज हक्काच्या बस सेवेसाठी मूग गिळून गप्प का आहेत? असा सवाल उपस्थित होत आहे. त्यातच, प्रवाशांच्या हक्कासाठी लढण्याचा दावा करणाऱ्या प्रवासी संघटनांच्या कार्यकर्त्यांनीही अचानक मौन धारण केल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.सध्या शहाद्यातील प्रवासी एसटी महामंडळाच्या या कारभाराला पूर्णपणे वैतागले आहेत. प्रवासासाठी दुसरा कोणताही ठोस पर्याय उपलब्ध नसल्यामुळे नाईलाजाने नागरिकांना या दुरवस्थेचा सामना करावा लागत आहे. महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी आणि लोकप्रतिनिधींनी आपली कुंभकर्णी झोप मागे सारून शहादा आगाराला त्याचा हक्काचा वाटा आणि नवीन बसेस तात्काळ दिल्या नाहीत, तर येत्या काळात प्रवाशांच्या संतापाचा उद्रेक झाल्याशिवाय राहणार नाही.

# पालकमंत्री रावल यांनी बुराई मध्यम प्रकल्पातून ५६.३२ दशलक्ष घनफूट पाण्याचे आवर्तन सोडले



**धुळे, दि.११- साक्री व शिंदखेडा तालुक्यातील गावांमध्ये निर्माण झालेल्या पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेऊन टंचाई निवारणार्थ बुराई मध्यम प्रकल्पातून ५६.३२ दशलक्ष घनफूट (दघलफुट) आरक्षित पिण्याच्या पाण्याचे आवर्तन राज्याचे राजशिष्टाचार मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते सोडण्यात आले.**

फोफादे येथील बुराई मध्यम प्रकल्पावर आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री ना.रावल यांनी पाण्याचे आवर्तन सोडण्यात आले. यावेळी तहसिलदार साहेबराव सोनवणे, पाटबंधारे विभागाचे शाखा अभियंता पियुष पाटील, शाखा अभियंता सागर गवळी, दोडाईचा बाजार समितीचे सभापती नारायण पाटील तसेच परिसरातील शेतकरी ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते. पालकमंत्री रावल म्हणाले की, साक्री व शिंदखेडा तालुक्यातील गावांमध्ये निर्माण झालेल्या पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेऊन राखीव पिण्याचे पाणी सोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांसह शेतकऱ्यांनाही मोठा दिलासा मिळणार आहे. देशात अल निनोचे सावट असून यंदाचा पावसाळा उशिराने सुरू होत आहे. मात्र १५ जूननंतर राज्यात चांगल्या पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तविली असल्याचे ही त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या हितासाठी राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना, मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजना यांसारख्या विविध योजना सुरू केल्या असून शासन शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून काम करीत असल्याचेही त्यांनी नमूद केले. या आवर्तनामुळे बुराई मध्यम प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील साक्री तालुक्यातील दुसाणे, बळसाणे, सतमाने व कढरे तसेच शिंदखेडा तालुक्यातील रेवाडी व देवी या गावांना आरक्षित पिण्याच्या पाण्याचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे या गावांतील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यास मदत होणार असून टंचाईची तीव्रता कमी होण्यास हातभार लागणार आहे.

## अवैध प्रवासी वाहतुक एसटीची धडक कारवाई

नवापूर, दि.११ प्रतिनिधी- राज्य परिवहन महामंडळाच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी तसेच प्रवाशांना सुरक्षित, विश्वासार्ह व आरामदायी प्रवास सेवा उपलब्ध करून देण्यासाठी नवापूर एसटी आगारामार्फत अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात विशेष धडक मोहीम राबविण्यात येत आहे. दि.५ ते १५ जून २०२६ या कालावधीत ही मोहीम सुरू असून खासगी वाहनांतून होणाऱ्या बेकायदेशीर प्रवासी वाहतुकीवर कडक कारवाई केली जात आहे.

खासगी वाहनांद्वारे मोठ्या प्रमाणात प्रवासी वाहतूक होत असल्याने राज्य परिवहन महामंडळाच्या उत्पन्नावर परिणाम होत असून, प्रवाशांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण होत आहे. यामुळे एसटी महामंडळाने व्यापक जनजागृतीसह कारवाईची मोहीम हाती घेतली आहे.

या मोहिमेअंतर्गत नवापूर बसस्थानकाच्या दोन्ही बाजूंना २०० मीटरपर्यंतचा परिसर नो पार्किंग झोन म्हणून घोषित करण्यात आला असून संबंधित सूचना फलकही लावण्यात आले आहेत. या परिसरात अवैध प्रवासी वाहतूक करताना कोणतेही वाहन आढळल्यास स्थानिक पोलिसांच्या मदतीने मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई केली जात आहे.

धुळे विभागाचे सुरक्षा व दक्षता अधिकारी दीपक धात्रक, नवापूर आगार व्यवस्थापक विजय पाटील, सहाय्यक वाहतूक अधीक्षक यशोवर्धन नगराळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. नवापूर आगारातील पर्यवेक्षक कर्मचारी तसेच नवापूर पोलीस ठाण्याच्या वाहतूक शाखेचे अधिकारी व कर्मचारीही या कारवाईत सक्रिय सहभाग घेत आहेत. एसटी महामंडळाने नागरिकांना आवाहन केले आहे.

## पान १ वरुन

### बँक खात्यांचा गैरवापर करणाऱ्या

उपलब्ध करून दिल्याचे निष्पन्न झाले. या माध्यमातून फसवणुकीतून मिळालेली रक्कम विविध खात्यांद्वारे वळविण्याचे काम केले जात असल्याचे पोलिसांनी सांगितले. कारवाईदरम्यान पाच मोबाईल फोन, चार पासबुक, दोन एटीएम किट, दोन दुचाकी, लोखंडी फायटर तसेच इंडियन पोस्ट पेमेंट बँकेचे कार्ड असा एकूण १५ वस्तूंचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त मुद्देमालाची किंमत ४०,०५० असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणाचा पुढील तपास नंदुरबार पोलिसांकडून सुरू असून सायबर गुन्ह्यांमध्ये बँक खाती व कागदपत्रे इतरांना वापरण्यास देऊ नयेत, असे आवाहन पोलिस प्रशासनाने नागरिकांना केले आहे.

### म्हसावद गावात शासकीय आरोग्य सेवा उपलब्ध

ही आश्वासनाची पुर्तता झालेली नाही. तरी सामान्य जनता आरोग्य सेवेपासून वंचित आहे. आरोग्य सेवेबाबतच्या दिरंगाईमुळे जनतेच्या असंतोषाचा भडका उडणार नाही याची प्रशासनाने काळजी घ्यावी असा इशारा आदिवासी सेवक तथा जेष्ठ नेते डॉ.कांतीलाल टाटीया यांनी निवेदनातून दिला आहे.

### मुंडेच्या पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रम

प्रमोद काकडे, निखिल ओगले, चंद्रकांत गीते, विकी सानप, सोनू गीते, बबलू सांगळे, कौस्तुभ नागरे, मनोज आव्हाड, गौरव सांगळे, पंकज विंचू, नकुल सांगळे, चंद्रकांत काकडे, दिनेश सांगळे, विजय साबळे यांच्यासह परिसरातील नागरिक व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पत्रकार बांधव

धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघ(आपला महाराष्ट्र) धुळे सभासद नोंदणी सुरु असून दि.६ जुन ते १३ जुन २०२६ पर्यंत संघाचे सदस्याचे फार्म भरुन देणे आहे. त्यासाठी फार्म फी.१० रु व सदस्य फी रु.५० असे एकूण साठ रु भरावयाचे आहेत. तरी सर्व सदस्यांनी मुदतीत फार्म भरुन सहकार्य करावे. कळावे

वेळ – सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत

डी.बी.पाटील, सरचिटणीस
यशवंत हरणे, अध्यक्ष
धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघ

## निधन वार्ता

### मंगलबाई वाणी



धुळे, दि.११- शहरातील सुभाष पुतळा दत्तवाडी येथिल रहिवासी मंगलबाई भगवान शेठ वाणी यांचे अल्पशः आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे तीन मुलं नरेश, सुरेश, जगदीश व सुना नातवंडे असा परिवार आहे. श्री राणा प्रताप मंडळाचे खजिनदार सुरेश वाणी यांच्या आई व श्री भगवान गबा शेठ वाणी यांच्या धर्मपत्नी होत.


**वीर सावरकर जयंती निमित्त शुभारंभ**

**वीर सावरकर अपार्टमेंट**

फ्लॅट बुकिंग व भाड्याने देणे आहे.

फ्लॅट एरिया :-
1 BHK - 1000 स्के.फुट
2 BHK - 1200 स्के.फुट,
3 BHK - 1350 स्के.फुट

बुकिंगसाठी संपर्क
मालक तात्यासाहेब रघुनाथ भगवान चौधरी
मो. 9405466937
इंजि.राजेंद्र के.खैरनार (बी.ई.सिव्हिल)
मो. 9422789513
पत्ता : वाणी मंगल कार्यालयाजवळ, भिडेबाग देवपूर, धुळे

**विकणे आहे**
लोखंडी पत्र्याची लोटगाडी विकणे आहे.
(सर्व कामांसाठी उपयोगी)
: संपर्क :
7507905075

**किडनी रोग तज्ञ**
डॉ.ललित देसले
डी एम (नेफ्रॉलॉजिस्ट) किडनी रोग तज्ञ
– ओपीडी वेळ –
सकाळी – १० ते २
संध्याकाळी – ४ ते ६
ठिकाण –
ओम हॉस्पिटल, अग्रवाल नगर, मालेगाव रोड, धुळे.
– संपर्क –
02562-241313, 283318
9881116734
9890038308

**प्लॉट विकणे आहेत**
आर्वी NH-3 हायवेलगत केले नगर येथील गट नं.२२८ या ले-आऊट मधील प्लॉट विकणे आहे.
आर्वी NH-3 हायवेलगत श्रीकृष्ण नगर येथील गट नं.२३२ या ले-आऊट मधील प्लॉट विकणे आहे.
आर्वी NH-3 हायवेलगत भगवती विहार येथील गट नं.२६५/३/१ या ले-आऊट मधील प्लॉट विकणे आहे.
संपर्क – 9422792677, 8888192677

**नोकरीची सुवर्णसंधी**
धुळेच्या सुप्रसिद्ध बेकरी मध्ये हवेत Marketing and Sales प्रतिनिधी ग्राहकांना उत्पादनांचे नमुने दाखवणे व ऑर्डर मिळवणे.
चांगला पगार व इंसेंटिव, प्रगतीची संधी
- समक्ष भेटा -
लाईफ लाईन बेकरी
मालेगाव रोड, धुळे
7507699616

**ड्रायव्हर पाहिजे**
बर्फाच्या गाडीसाठी सकाळी लवकर येणारा ड्रायव्हर पाहिजे.
मुंदडा आईस फॅक्टरी
पारोळा रोड धुळे

**पाहिजेत**
- नर्स (ANM GNM)
- R.M.O
- रिसेप्शनिस्ट
- B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट

संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

**पेवर ब्लॉक**
उच्च दर्जाचे पेवर ब्लॉक मिळतील.
शांती सिमेंट प्रॉडक्टस, डी.६५, एमआयडीसी, अवधान, धुळे
– संपर्क –
9422289550

**जागा कराराने देणे**
सर्व सोयीयुक्त ६०० स्के.फुट जागा बँक, ऑफिसेससाठी कराराने देणे आहे.
पत्ता - ग.क्र.५, शाळा क्र.९ च्या बाजुला, धुळे
9823561526

**पाहिजेत**
मेडीकल दुकानात कामासाठी अनुभवी फार्मसिस्ट व होतकरु मुलगा पाहिजे.
- संपर्क -
9922576551

**पाहिजे**
लॉज काम नाईट (रात्रपाळीसाठी) मॅनेजर पाहिजे.
शांती गीत लॉज
आग्रारोड, धुळे
7264037000

**पाहिजेत**
दुकान कामासाठी महिला, पुरुष पाहिजे.
- संपर्क -
द झुला हाऊस
मेनरोड, जयहिंद हायस्कूल शेजारी, देवपूर, धुळे
9404111111

**प्लॉट विकणे आहे**
रामचंद्र नगरला लागुन दोन रस्त्यांच्या कॉर्नरचा ४००० स्केअर फुटाचा प्लॉट विकणे आहे.
सुरेश चौधरी
9422289235

**पाहिजेत**
कुक व्हेज पाहिजे.
वेटर पाहिजे.
चपातीसाठी बाई पाहिजे.
हॉटेल ज्योती पंजाब
राणा प्रताप चौक, धुळे


## पुण्यस्मरण



कै.सुमतीबाई गोपीचंद बारी (मृत्यू दि.२२/४/२०२२)
कै.गोपीचंद रामचंद्र बारी (मृत्यू दि.१२/६/१९८८)

आठवणींच्या गाभाऱ्यात स्थापीली मूर्ती तुमची
तिला वाहतो फुले आम्ही टपकणाऱ्या आसवांची
भावपूर्ण श्रद्धांजली ! सुमनांजली ! ओमशांती !!

-------: श्रद्धावनत् :-------

| | |
|---|---|
| मधुकर गोपीचंद बारी (मुलगा) | सौ.वैशाली मधुकर बारी (सून) |
| दिपक गोपीचंद बारी (मुलगा) | सौ.मिनाक्षी दिपक बारी (सून) |
| सुरेश गोपीचंद बारी (मुलगा) | डॉ.प्रा.सौ.योगिता सुरेश बारी (सून) |
| किशोर दत्तात्रय बारी (जावई) | सौ.रेखा किशोर बारी (मुलगी) |
| संदीप किशोर बारी (नातू) | सौ.नीलाक्षी संदीप बारी (नातसून) |
| डॉ.सौ.लिना वैभव बारी (नात) | डॉ.वैभव भिका बारी (नातजावई) |
| डॉ.कु.मानसी मधुकर बारी (नात) | यश मधुकर बारी, कॅनडा (नातू) |
| प्रणव सुरेश बारी (नातू) | अक्षद दिपक बारी (नातू) |
| वेदान्त सुरेश बारी (नातू) | आदित्य दिपक बारी (नातू) |

पणतू :- अथर्व, कार्तिक, हर्षित, क्रिष्णवी

-: फर्म्स :-

मानसी एजन्सीज, धुळे — यश डिस्ट्रीब्युटर्स, नाशिक
राजवी कलेक्शन, नाशिक — श्री कलेक्शन, दत्तमंदिर, धुळे
न्यु सेंट्रल बुक स्टॉल, धुळे — कार्तिक डेंटल क्लिनिक, कळवा, ठाणे

## ।। आठवे पुण्यस्मरण ।।



**कै. स्व. जवेरीलालजी व्रजलालजी जैन (कोटडीया)**
स्वर्गवास दि. १२/०६/२०१८

*आपके आदर्श विचार, संस्कारोके पथयात्री है हम।*
*यादे हजारो, नैनो मे पानी, पलपल होती है आँखे नम।।*
*महावीर इलेक्ट्रीकल्स के जन्मदाता, धर्मप्रभावना थी महान।*
*आपके आदर्शोका करेंगे हम सन्मान।।*
*पुण्यस्मरण आपका, उदास हमारा मन।।*
*आपके चरणोमे समस्त कोटडीया (जैन) परिवार*
*चढाता है कोटी कोटी श्रध्दासुमन*

**शोकाकुल**

| | |
|---|---|
| संकल्प जवेरीलाल जैन (पुत्र) | सौ. करिश्मा संकल्प जैन |
| रमेश व्रजलाल जैन (भाई) | सौ. सुभद्रा रमेश जैन |
| महावीर व्रजलाल जैन (भाई) | सौ. सुशिला महावीर जैन |
| विजय व्रजलाल जैन (भाई) | सौ. सुधा विजय जैन |
| अभिजीत महावीर जैन (भतीजा) | सौ. प्राची अभिजीत जैन |
| सत्यजीत विजय जैन (भतीजा) | सौ. नेहा सत्यजीत जैन |
| अभिषेक विजय जैन (भतीजा) | सौ. प्रियंका अभिषेक जैन |

श्रीमती वसंताजी अजितलालजी जैन

| | |
|---|---|
| अरूण कुमारजी जैन | सौ. विमलाजी अरूणजी जैन |
| राजेशकुमारजी जैन (जमाई) | सौ. संगिता राजेश जैन |
| धर्मेशकुमारजी जैन (जमाई) | सौ. विणा धर्मेश जैन |
| दिलीपकुमारजी जैन (जमाई) | सौ. ज्योत्सना दिलीप जैन |
| मनीषकुमारजी जैन (जमाई) | सौ. हिना मनीष जैन |
| रवीकुमारजी जैन (जमाई) | सौ. भावना रवी जैन |
| आशिषकुमारजी जैन (जमाई) | सौ. श्रध्दा आशिष जैन |
| अमितकुमारजी जैन (जमाई) | सौ. स्नेहा अमित जैन |

कु. वैदेही, चि. सिध्दांत , कु. अनैशा चि.अर्थव, संचित व समस्त कोटडीया परिवार

फर्म : श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही. | श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे
श्री महावीर सेल्स एजेंसी | अशोक नगर, लेक सिटी मॉल समोर, उदयपुर-राजस्थान.

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०